पाक्षिक | शेतकरी संघटक | वर्ष ११ वे
वार्षिक वर्गणी रु. ३० | | अंक ४ था
किंमत १ रुपया २५ पैसे | | ६ जून १९९४

# बँकांची व्यंकटी सांडो

- शरद जोशी

**एक संप अधिकाऱ्यांचा**

५ मे रोजी राष्ट्रीयीकृत बँकांचा अधिकारी वर्ग एक दिवसाच्या लाक्षणिक संपावर गेला. त्यांच्या मागण्या काय होत्या हे फारसे स्पष्ट झाले नाही. राष्ट्रीयीकृत बँकांमधील उधळमाधळ थांबवावी. तोटा कमी करावा, घाट्यातील शाखा बंद कराव्यात असे आदेश शासनाकडून निघाले आहेत. याच धर्तीचे आणखी काही आदेश निघण्याची शक्यता आहे. बँकांना शेअर बाजारात ४९ टक्क्यांपर्यंत भांडवल गोळा करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे संचालक मंडळावर व्यावसायिक दृष्टीचे लोक येतील आणि बँक कर्मचाऱ्यांना काम करायला सांगतील अशीही भीती कर्मचाऱ्यांना वाटत असावी. खाजगी क्षेत्रात नवीन बँका उघडण्यास शासनाने परवानगी दिली आहे आणि काही परदेशी बँका हिंदुस्थानात प्रवेश करू लागल्या आहेत. त्यांच्या स्पर्धेचाही धोका बँक कर्मचाऱ्यांना वाटत असावा. राष्ट्रीयीकृत बँकांची मक्तेदारी तोडण्याच्या प्रयत्नांना विरोध करणे हा संपाचा प्रमुख हेतू. त्याबरोबर तोंडी लावणे म्हणून काही पगार वाढीच्या वगैरे मागण्या असाव्यात.

५ तारखेला संप झाला. देशभरच्या सगळ्या बँकांचे कामकाज ठप्प झाले. संप यशस्वी होणार यात कोणाला काहीच शंका नव्हती. संप बँकअधिकाऱ्यांचा होता, पण अधिकाऱ्यांची सही घेतल्याखेरीज कर्जाचे व्यवहार तर सोडाच पण खात्यात पैसे जमा करून घेण्याचे किंवा खात्यातून रक्कम काढण्याचे व्यवहार कसे काय होऊ शकणार? अधिकारी अधिकृतरित्या संपावर राहिले आणि कर्मचारी कामावर आले. काम नसल्यामुळे चकाट्या पिटण्याला, चहा पिण्याला आणि इकडे तिकडे फिरण्याला एरव्हीपेक्षा जास्त वेळ मिळाला एवढेच.

**एक संप कर्मचाऱ्यांचा**

११ मे रोजी पुन्हा एक दिवसाचा लाक्षणिक संप झाला. यावेळी अधिकारी कामावर होते पण कर्मचारी कामावर नव्हते. ११ तारखेची निवड संपासाठी मोठ्या हुशारीने करण्यात आली होती. १२ ला शिवजयंतीची सुट्टी, १३ अक्षय्य तृतीयेचा एक कामाचा दिवस की नंतर १४ आणि १५ ला शनिवार आणि रविवार अशी मोठी नामी युक्ति कर्मचाऱ्यांच्या युनियनने आखली होती. त्यानंतर २४ मे आणि २-३ जून या दिवसांच्या संपाचेही कार्यक्रम जाहीर झाले होते. यंदा लाक्षणिक संपांच्या दिवसांची एकूण संख्या सात.

**एक बँकीय अनुभव**

रोख पैशाची विशेष गरज पडल्यामुळे मी स्वतःच पैसे काढण्याकरिता बँक ऑफ इंडियाच्या शाखेत गेलो. काऊंटरपाशी एकही कर्मचारी चाकण येथील बसलेला नव्हता. काऊंटरमागील टेबलांवर मात्र अर्धा डझन अधिकारी आपली थकीत कामे उरकत असल्याचे दिसत होते किंवा भासवत होते.

त्यातील सर्वात जवळच्या एकाचे लक्ष मी वेधून घेतले आणि मला पैसे काढायचे असल्याचे सांगितले. हा अधिकारी माझ्यासारख्या कोणा प्रश्न विचारणाऱ्याची उत्सुकतेने वाट पहात असावा असे दिसले. मोठ्या विजयी सुहास्य मुद्रेने 'आज बँकेत कर्मचाऱ्यांचा संप असल्यामुळे सर्व व्यवहार बंद असल्याचे' त्यांनी सांगितले.

बँकेत काही कर्मचाऱ्यांचा संप असणे ही बँकेची अंतर्गत बाब आहे. त्यात मला काही स्वारस्य नाही. मला माझे पैसे, बँकेकडे जमेसाठी ठेवलेले परत हवे आहेत, बँकेची ती कायदेशीर जबाबदारी आहे, असे काहीसे ऐकवल्यानंतर तो अधिकारी म्हणू लागला, ''मी या शाखेतील अधिकारी नाहीच – मी लेखा परीक्षेकरीता येथे आलो आहे.'' आवाज ऐकून शाखा प्रमुख बाहेर आले. नमस्कार-चमत्कार केला. आत येऊन खोलीत बसा अशी आदरातिथ्याची विनवणी झाली. पण मी काऊंटरसमोर राहून पैसे काढणार आहे असे सांगितल्यावर सगळे आदरतिथ्य बाजूला झाले आणि 'कर्मचाऱ्यांचा संप असल्यामुळे काही व्यवहार होणार नाहीत' असे त्यांनी विनम्रतेने पण खंबीरपणे सांगितले. मी युक्तिवाद घातला. 'आज बँकेची सुटी नाही, माझ्या खात्यात पैसे आहेत, ते देण्यास बँकेने नकार दिला तर

कायद्याप्रमाणे हा गुन्हा होतो, बँकेने दिवाळे काढले आहे असा त्याचा अर्थ होतो.' पण शाखा प्रमुखांची भूमिका पक्की. 'आता तुम्हाला आम्ही काय सांगणार? पण आज पैशाचा व्यवहार होणे शक्य नाही. कारण कॅशियर सगळे संपावर गेले आहेत.'

**वरती विचारून सांगतो**

माझ्या चेकवर तो स्वीकारता येत नाही असे शाखाप्रमुखांनी सही शिक्क्यानिशी लिहून द्यावे असा मी आग्रह धरला. अद्यापपर्यंत इतक्या संपात अशी विनंती साहेबांना कोणी केलेली नसावी. दुसरा कोणी ग्राहक असता तर त्याला त्यांनी सरळ आणि सहज उडवून लावले असावे. काऊंटरपाशी उभे राहून मी हुज्जत घालत असताना दर मिनिटा दोन मिनिटाला कोणी ना कोणी ग्राहक बँकेच्या दरवाज्यातून आत येत होता. काऊंटरवरची सामसूम आणि सुनसुनाट पाहिल्यावर 'आज पुन्हा बँकेत संप आहे वाटते!' असे म्हणून तोंड वाकडे करून निघून जात होता, अधिकाऱ्यांकडे कोणतीही तक्रार न करता अटीतटीला पडलेला मी एकटाच होतो.

चेक वटवता येत नाही हे लिहून द्या ही मागणी ऐकून शाखाप्रमुख अडचणीत पडले. 'वरच्या ऑफिसरला फोन करून विचारतो, म्हणाले, 'चाकणमध्ये फोन व्यवस्था आहे. नव्याने S.T.D. व्यवस्थाही चालू झाली आहे. गावात फोन नसता किंवा बँकेचा फोन बंद असता तर साहेबांनी काय केले असते कोण जाणे. साहेबांनी पुण्याच्या प्रमुख कार्यालयास फोन लावला. मध्यंतरी मी काऊंटरपाशी उभाच. लोक सतत येत होते. काम बंद पाहून परत निघून जात होते. साहेबांचा ट्रंककॉल काही लागेना.

बँकेच्या शेजारच्या इमारतीतील सामानाच्या वखारीचे मालक बँकेत डोकावून गेले. मला नमस्कार करून हालहवाल विचारते झाले. मी सत्याग्रह करून बसलो आहे याचे त्यांना काही आश्चर्य वाटण्याचे कारण नव्हते, चाकणभर मला ओळखतात. वखार मालकांनी बँकेच्या साहेबांपुढे एक प्रस्ताव मांडला. साहेबांना का खोळंबवता? तुमचा ट्रंककॉल कधी लागायचा? माझ्या वखारीत या माझ्या खर्चाने S.T.D. कॉल लावा. साहेब प्रस्ताव मान्य करतील असे मला वाटले नव्हते. S.T.D. कॉलचे पैसे अर्थात द्यावे लागणार नव्हते. पण आगाऊ ग्राहकाला परस्पर अद्दल घडवण्यासाठी टेलिफोन बांधवांची दिरंगाई साहेबांना तशी सोयीस्कर होती. त्यांनी वखारीत जाऊन फोन करण्याचे मान्य केले. साहेब गेले, मग बाकीच्या अधिकाऱ्यांना माझ्याकडे लक्ष देण्याचे काही कारण नव्हते. मिनिटामागून मिनिटे गेली. अर्धा तास होऊन गेला. पुण्याचा फोन लागला. पण पुण्याच्या कार्यालयातील उच्च अधिकारी जागेवर नव्हते, पुन्हा एकदा फोन वाजला, पण निर्णय काही मिळाला नाही. कदाचित् पुण्याच्या अधिकाऱ्यांना मुंबईच्या अधिकाऱ्यांशी सल्ला मसलत करण्याची आवश्यकता भासली असावी. पुण्यात मोफत S.T.D. फोन करू देणारा वखारवाला दुर्मिळच. त्यामुळे मुंबईहून आदेश मिळायला वेळ लागत असावा.

**'बँक कर्मचारी बाहेर हाती लागला तर'**

शेवटी, चांगल्या तासासव्वातासाने शाखाप्रमुख वखारीतून आले. आपल्या केबिनमध्ये गेले. लघुलिपिकाला बोलावून घेतले आणि नंतर बाहेर येऊन माझ्या हाती एक पत्र दिले. या पत्राची छायालिपी मोठी बघण्यासारखी आहे. 'कर्मचाऱ्यांच्या एका संघटनेचे सभासद आज संपात सामील झाले आहेत. त्यामुळे आज आम्ही कॅश व्यवहार सुरू करू शकलेलो नाही. आम्ही आपल्या सदर चेकचे पेमेंट करू शकत नाही. इ. इ.

कामगारांनी आपापल्या मागण्यांकरिता संप करावा हे समजण्यासारखे आहे. बँककर्मचाऱ्यांचे पगार, त्यांचे भत्ते, त्यांना मिळणाऱ्या सोयी सवलती, घरबांधणीची कर्जे हे सर्वांना ठाऊक आहे. घाईगर्दीत असलेले ग्राहक काऊंटरच्या पलीकडे बसलेले, घड्याळ्याच्या काट्यांवर नजर लावून चुळबूळ करीत आहेत, बँककर्मचारी गप्पा मारत रमतगमत आपली कामे चालवत आहेत. काऊंटरवरील ग्राहकाचे काम चटकन् संपवण्याऐवजी काऊंटर बंद झाल्यानंतर करावयाची कामे हिशेबठिशेब बिनधास्तपणे आधीच उरकून घेत आहेत हे पाहिल्यामुळे ज्याचा संताप झाला नाही असा कोणी ग्राहक नसेल. बँकेकडून कर्ज वगैरे हवे असेल तर कर्मचारी आणि अधिकारी मंडळी कर्जदाराला कशी लुटतात हे प्रख्यात आहे. यातील एखादा कर्मचारी कधी बँकेच्या बाहेर सापडला तर त्याचे काय करता येईल त्याची दिवास्वप्ने पहात बँकेचे ग्राहक ताटकळत प्रतीक्षा करीत तासन्‌तास उभे राहतात. हे सगळे खरे. बँक कर्मचाऱ्यांनी संप करावा हे योग्य नसेल, दुष्टपणाचे असेल, गुन्हेगारीचे असेल, पण समजण्यासारखे आहे.

**हे कसले नादान व्यवस्थापन**

माझी तक्रार संपावर गेलेल्या कर्मचाऱ्यांबद्दल नाही, कामावर असलेल्या अधिकाऱ्यांबद्दल आहे; बँक ऑफ इंडियाच्या प्रमुख कार्यालयातील सर्वोच्च अधिकाऱ्यांबद्दल आहे.

या सर्व अधिकाऱ्यांनी संपकऱ्यांशी संगनमत केले आहे. अमुक एक तारखेला संप होणार असे कळल्यानंतर जनतेची गैरसोय कमीत कमी कशी होईल आणि बँकेचे व्यवहार जास्तीत जास्त सुरळीतपणे कसे चालतील याची व्यवस्था बँकेच्या प्रशासनाने आणि अधिकाऱ्यांनी करायला पाहिजे होती. संपाच्या आदले दिवशी संपकाळात आवश्यक इतकी रक्कम शाखाप्रमुखांनी आपल्या हाती घेऊन, निदान तातडीची गरज असलेल्या ग्राहकांच्या गरजा पुऱ्या करण्याची व्यवस्था सहज करता आली असती. कर्मचारी संपावर गेले तरी उपस्थित अधिकाऱ्यांना जितकी सेवा देणे शक्य होते तितकी देण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होते. अधिकाऱ्यांनी आणि प्रशासनाने असा काही काडीमात्रही प्रयत्न केला नाही. उलट, संपकऱ्यांची लढाई म्हणजे आपली लढाई

आणि संपकऱ्यांचा विजय आपलाच विजय अशा थाटात ते वावरत होते.

टपाल खात्यातील संपात, अधिकारी वर्ग आठआठ दिवस अक्षरशः 'अहर्निशम् सेवामहे' ह्या खात्याच्या ब्रीदवाक्यास जागताना मी पाहिला आहे. पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये कर्मचाऱ्यांनी संप केल्यावर डॉक्टरमंडळी साफसफाईच्या कामात गढलेली मी पाहिलेली आहेत. लोकांचे पैसे लोकांना देण्याची टाळाटाळ संपाच्या निमित्ताने करणारे बँकव्यवस्थापक त्यांच्या पदावर बसण्यास आणि बँकर म्हणवून घेण्यास पात्र नाहीत.

संपानंतर माझे मत अधिक ठाम झाले. खाजगी बँका येऊ देते, परदेशी बँका येऊ देत, अगदी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या बँका येऊ देत. पण राष्ट्रीयीकृत बँकांतील कर्मचाऱ्यांची नांगी ठेचणे आवश्यक आहे.

**आमच्या नशिबी अशी बँक सेवा कधी येईल?**

स्टार टेलिव्हिजनवर एका बँकेची जाहिरात येते. बँकेकडून कर्ज कसे मिळवावे याची चौकशी करण्याकरिता एक नवखे ग्राहक बँकेस फोन करते. देशी बँकांच्या सवयीप्रमाणे अर्ज कोणत्या फॉर्मात करावा लागेल, सोबत कागदपत्र काम जोडावे लागतील, कोणाचे दाखले घ्यावे लागतील, गहाण काय ठेवावे लागले इ. प्रश्न तो मोठ्या काकुळतीने बँकअधिकारी बाईस विचारतो. ती प्रत्येक प्रश्नाला हास्यमुद्रेने उत्तर देते, 'त्याची काहीच गरज नाही.' हे संभाषण दोनतीन मिनिटे चालते आणि शेवटी बँककर्मचारी बाई ग्राहकाला म्हणते 'पण, तुमचे कर्ज मंजूर झाले आहे.'

राष्ट्रीयीकृत बँकांची सद्दी संपो, दुरितांचे तिमिर जावो आणि ग्राहकांवर अरेरावी करणाऱ्या देशी मग्रूर बँकसाहेबांचा निःपात होवो, जिद्दीने स्पर्धा करून ग्राहकांना अधिकाधिक सेवा देणाऱ्यांचा सूर्य लवकर उगवो अशी प्रार्थना करण्यापलीकडे आपल्या हाती काय आहे?

●●●

### लाडेगांव (ता. कारंजालाड, जि. अकोला)

## महिला आघाडीचे
# पाणी बचाव आंदोलन

— गजानन अहमदाबादकर, लाडेगाव.

**अधिकारी आणि पदाधिकारी यांनी लाडेगांवकरांवर केलेले आक्रमण**

सध्या महाराष्ट्रात गाजत असलेले लाडेगांव येथील महिला आघाडीचे पाणी बचाव आंदोलन म्हणजे, पाण्यासाठी होणाऱ्या इतर अंदोलनापेक्षा अगदीच वेगळे आहे. गेल्या २ मे ९४ ला महाराष्ट्राच्या जलसंवर्धन समितीचे सदस्य श्री. विलासराव साळुंखे यांच्या नेतृत्वात या आंदोलनाची पाहाणी करण्यासाठी आलेल्या अभ्यास गटातील सदस्य ''वृक्षमित्र'' मोहन हिराबाई हिरालाल यांनी या आंदोलनाला ऐतिहासिक आंदोलन म्हटले. (दै. देशोन्नती १० मे) तर शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते श्री. चंद्रकांत वानखडे यांनी या आंदोलनास गावकऱ्यांच्या अस्तीत्वाची लढाई म्हटले आहे, (दै. लोकमत १७ एप्रिल ९४) कुणी या आंदोलनास ''सारा गाव पेटून उठला, त्याची गोष्ट'' म्हटले, (दै. तरूण भारत १० एप्रिल, नागपूर) तर दै. लोकसत्तेने (६ एप्रिल ९४) याला आगळा वेगळा लढा म्हटले आहे. अनेक वृत्तपत्रांच्या पत्रकारांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी करून लाडेगांवची भूमिका ऐकून आपले मत लाडेगावकरांच्या बाजूने व्यक्त केले आहे.

**गावाची ओळख**

लाडेगाव - अकोला जिल्ह्यातील कारंजा (लाड) तालुक्यात दोन ते अडीच हजार लोकसंख्येचे गाव, वेगवेगळ्या कारणासाठी ओळखले गेले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या ठिकाणी बरेचदा येऊन गेले म्हणून गुरुदेव सेवा मंडळाची तिथे स्थापना झाली. त्यांचीच भजनं म्हणणारी मंडळी येथे आहे. कोरडवाहूचे बऱ्यापैकी पीक घेणारे म्हणून तालुक्यात ओळख. येथली पोरं चांगली कबड्डी खेळतात म्हणूनही लाडेगावचे नाव चर्चेत असे आणि गेल्या ८-१० वर्षांपासून शेतकरी संघटनेचं गाव म्हणून या गावाची परिसरातच नाही तर अकोला जिल्ह्यात ओळख झाली आहे. एकूण या गावाची ओळख झाली ती गाव म्हणून. कोणीही मोठा राजकीय नेता या गावचा नाही, की तालुका स्तरावरही राजकारण करणाराही नेता इथे नाही. तरी या गावात रस्त्यासाठी, नदीवरील पुलासाठी आंदोलनं झालीत. शेतकरी संघटनेच्या 'पुढाऱ्यांना गाव-बंदी' कार्यक्रमाचा मुहूर्त अकोला जिल्ह्यात याचा गावात झाला. 'लीडर' नसलेल्या या गावच्या लोकात (महिला आणि युवकात) निडरपणा आहे एवढं खरं.

या गावात आधुनिकतेच्या नावाने आलेले अवगुण फार नाहीत. सर्वच जातिधर्माचे लोक आपसात स्नेहाने वागत असल्याने कधी जातीय तणाव नाही. (तुकडोजी महाराज आणि संघटनेच्या विचाराला मिळालेला हा प्रतिसाद असावा.) कोणत्याही अधिकारी पदाधिकाऱ्याला इथे कधी पार्टी झाली नाही. असे हे लाडेगांव आज प्रशासनाच्या कार्यवाहीचे शिकार झाले आहे.

**पाणी बचाव आंदोलन का केले?**

लाडेगांवची बाजारपेठ असलेल्या कामरगावला १९८५ पासून होणारा पाणी पुरवठा ज्या दोन विहिरींतून होतो त्या कामरगाव पासून पाच साडेपाच कि.मी. अंतरावर असल्या तरी लाडेगाव वस्तीपासून उत्तरेस अगदी जवळ, अर्धा कि.मी. अंतरावरच आहेत. कामरगाव नळयोजनेच्या या विहिरीतून होणाऱ्या सतत उपशामुळेच सभोवतालच्या भूजल पातळीवर विपरीत परिणाम झाला असे तज्ज्ञांचे मत आणि बऱ्याच ठिकाणचे अनुभव असल्याने गावातील विहिरींची पाणी पातळी खोल जाण्याचे व

काही विहिरी चक्क कोरड्या पडण्याचे कारण समजले.

गावात महिलांमध्ये या विषयांवरून विशेष चिंता वाटायला लागली. गावातील पाहुण्या म्हणून आल्या गेलेल्या महिला ठिकठिकाणच्या पाणी समस्येचे अनुभव एकमेकींना सांगू लागल्या. पाणी समस्या गेल्या ३-४ वर्षापासून लाडेगांवच्या महिलांचा महत्त्वाचा प्रश्न आणि चिंतेचा विषय झाला होता. म्हणून कार्यकर्त्यांनी पाणी प्रश्नावर ह्या क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांची व सामाजिक कार्यकर्त्यांची भेट घेतली.

गावच्याच नाही तर परिसरातील लोकांशी चर्चा करून ''विदर्भ स्तरीय पाणलोट क्षेत्र विकास''आधारित गाव नियोजन शिबीराचे आयोजन करण्याचे ठरले.

तेवढ्यातच, कामरगांववासियांनी अधिक पाणी पुरवठा करण्याची केलेली मागणी शासनाने मान्य केली आणि कामरगांव-पूरक-पाणी पुरवठा योजनेसाठी पुन्हा एक विहिर (तिसरी) लाडेगांव वस्तीजवळ (१०० मीटर अंतरावर) खोदण्याचा प्रस्ताव करण्यात आला. पहिल्या विहिरीतून होणाऱ्या उपशाचा परिणाम भोगणाऱ्या लाडेगांवकरांनी १/९/९२ ला एक मिटिंग घेऊन या विहिरीला लाडेगांव परिसरात घेण्यास एकमुखी विरोध करण्याचे ठरले. ७/११/९२ ला तहसील कार्यालय (कारंजा लाड) येथून तक्रार मागविण्यात आली. दि. ११/११/९२ ला ग्रामवासियांनी तक्रार केली. दि. १२/११/९२ ला महिलांनी स्वतः जाऊन तहसील कार्यालयात तक्रार केली. लाडेगांववासियांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही, असे स्पष्ट अश्वासन महिलांना देण्यात आले. इथेच हे प्रकरण संपले असे समजून लाडेगांवचे सर्व नागरिक निश्चिंत झाले.

दि. २१ डिसेंबर ९२ च्या शेवटी घाईगर्दीत त्याच वादग्रस्त ठिकाणी विहिरीच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम उरकण्यात आला. विहिरीचे काम करण्यासाठी आलेल्या मजुरांची लाडेगांव येथील महिलांनी भेट घेऊन आपली अडचण व इरादा सांगितला. लाडेगांवकरांच्या इच्छेविरुद्ध जाऊन आम्ही तेथे काम करणार नाही म्हणून ते निघून गेले.

### पुढे सुरू झालं राजकारण

लाडेगांवच्या ग्रामपंचायतीचा ना हरकत ठराव घेण्यात आला. गावात फूट पाडून विहिरीचे राजकारण सुरू झाले. त्यामुळे गावकरी स्त्री-पुरुषात अधिक असंतोष वाढला. परिणामी १२ एप्रिल १९९३ ला एस्. डी. ओ. मूर्तीजापूर यांच्या अध्यक्षतेखाली कामरगांव ग्रा. पं. कार्यालयात अधिकारीय स्तराची बैठक झाली. त्यात पर्याय म्हणून नळ योजनेच्या मोठ्या विहिरीजवळच नवीन विहिरीसाठी जागा देण्यात आली. इतक्या जवळ कसे काय पाणी लागले अशी शंका लाडेगांवकरांनी उपस्थित केली.

तोपर्यंतच्या सर्व हालचाली लाडेगांव येथेच विहिर खोदण्याच्या दिशेने होत होत्या. लाडेगांवची वादग्रस्त जागा कामरगांवच्या कर्त्या मंडळींनी प्रतिष्ठेचा मुद्दा केली होती ही बाब स्पष्ट झाली.

### मागणीला शास्त्रीय आधार आहे

लाडेगांवलाच दि. १५-१६ मे १९९३ ला (पूर्वनियोजित) पाणलोट क्षेत्र विकास आधारित गाव नियोजनाचे विदर्भ स्तरीय शिबिर झाले. आजूबाजूच्या खेड्यातली कार्यकर्ती मंडळी या शिबिराला होती. गावातील महिला प्रामुख्याने हजर होत्या. पाणी क्षेत्रातील तज्ज्ञ व कार्यकर्ती मंडळी प्रशिक्षक म्हणून हजर होती.

डॉ. मु. अ. घारे, अध्यक्ष, अफार्म, पुणे हे प्रामुख्याने हजर होते. संबंधित विषयातील ते संशोधक असल्याने महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी त्यांना प्रत्यक्ष जागेची पाहाणी करण्याची विनंती केली. एकूण परिसराची पाहणी करून, संभाव्य विहीर लाडेगांव परिसरात झाल्यास लाडेगांववासियांच्या पिण्याच्या पाण्यावर फार मोठ्या प्रमाणात निर्बंध येतील असा स्पष्ट अभिप्राय त्यांनी २१/५/९३ ला अकोला येथील जिल्हाधिकारी यांना कळविला आहे.

### पर्याय शोधण्याचे नाटकी प्रयत्न

जुन्या विहिरी जवळ १००-१५० फूटावर एक ट्रायल बोअर घेतले. ते कोरडे लागले. मग पुन्हा लाडेगांवच्या दिशेने मोर्चा वळला. वास्तविक लाडेगांवकरांची मागणी अशी आहे की, २३ लाख रु. खर्चून कामरगांवची मुख्य नळयोजना ज्या कारणामुळे विफल झाली. (भूमार्गातील उपशामुळे) तीच पद्धत पुन्हा अवलंबली जात आहे. त्यामुळे लाडेगांव वस्तीजवळचा परिसर कोरडा होऊन, सध्याच जेमतेम असलेली पाणी व्यवस्था अधिकच भीषण होईल आणि एवढ्या विहिरीच्या भरवश्यावर कामरगांवची सोय होणार नाही. पुन्हा एक दोन वर्षातच कामरगांव या बाजारपेठेच्या ठिकाणची व्यवस्था करावी लागेल. म्हणून सध्याच ती व्यवस्था कामरगांव जवळच्या ८-१० कि. मी. वर असलेल्या खांदला किंवा हीवरा धरणावरून करावी असा लाडेगांववासीच नाही तर कामरगांव व त्या परिसरातील लोकांची मागणी आहे.

**दि. ४ मार्च** - या सर्व शक्यता नाकारून दि. ४ मार्च १९९४ शुक्रवारला दु. २ ते ३ च्या दरम्यान अकोल्याचे जिल्हाधिकारी श्री. सुधीरकुमार श्रीवास्तव यांनी लाडेगांवला अचानक भेट दिली. वादग्रस्त जागेची पाहणी करत असताना, उन्हाळ्यात शेतीकामावरून दुपारी परतलेल्या महिला घाईगर्दीत जिल्हाधिकाऱ्यांकडे गेल्या. महिलांनी अधिकाऱ्यांना लाडेगांव परिसरात पुन्हा विहिर खोदू नका अशी विनंती केली आणि घारे साहेबांच्या अभिप्रायाचा दाखला दिला. 'उसकी क्या तिसरी आँख है?' अशी अधिकाऱ्यांनी अवहेलना करणारे उत्तर देताच एक म्हातारी भावनेच्या भरात बोलली की, ''इथुलु पाणी नेल्यावर आम्ही काय मूत प्यावं?'' बस! इतकं बोलण्याचा गहजब झाला आणि लाडेगांवलाच विहिर खोदण्याचा निर्णय झाला. कलेक्टरांना शिव्या दिल्या अशी सर्व जिल्ह्यांत अफवा पसरली. लहानमोठ्या अधिकाऱ्यापासून पदाधिकाऱ्यापर्यंत हीच चर्चा ऐकिवात होती.

दि. १० मार्च ९४ ला काँग्रेसचे स्थानिक खासदार श्री. अनंतराव देशमुख यांचा शेजारच्या बेलखेड गावांत उद्घाटनाचा कार्यक्रम होता. आयोजकांची तक्रार नसताना लाडेगांव येथील संघटनेचे कार्यकर्ते गजानन

अमदाबादकर व प्रकाश सवाई यांचेसह २६ महिला-पुरुष-बालकांना स्थानबद्ध करण्यात आले. गावात दहशत बसविण्याचा तो प्रयत्न असावा अशी चर्चा होती.

दि. ४ मार्चला लाडेगांव येथून परत आल्यावर शेतकरी संघटनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य श्री. प्रकाशभाऊ पोहरे यांना फोन करून आम्ही तिथे विहीर खोदणार असा धमकीवजा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला असल्याचे ऐकीवात आहे. आणि, लाडेगांवला सशस्त्र पोलिस बंदोबस्तात विहिरीचे खोदकाम होणार ही चर्चाही जिल्हाभर होतीच.

**महिला आघाडीचा निर्धार कायम**

१७ मार्च १९९४ ही विहीर खोदण्याची तारीख ठरली. १६ मार्चला सायंकाळी ५ वाजल्यापासून महिला पुरुषांनी विहिरीच्या नियोजित ठिकाणी उपोषण आणि धरणे आंदोलनास सुरुवात केली. १६ मार्चला रात्री गावात लाऊडस्पीकर वरून (जीपमधून) पोलिस लोकांना सूचना देत होते. दि. १७ मार्चला सकाळी शेकडो, स्त्री-पुरुष-विद्यार्थी-मुलाबाळांसह सशस्त्र पहाऱ्यास न जुमानता वादग्रस्त विहिरीच्या खोदकामाला थांबविण्यासाठी प्रतिकार आंदोलनात सामील झाले. सकाळी ९ वाजता पोलिसांनी अटकसत्र सुरू केले. ३०० ते ३५० लोकांना अटक करण्यांत आली. पोलिस स्टेशन धनज येथे त्यांची रवानगी करून पुढे कारंजा तहसील कार्यालयावर नेण्यात आले. तिथे रात्रभर सर्वांना उघड्यावर बसवून ठेवले. अटक झालेल्या आंदोलकांना जेवण नाही, ना पाणी. असे आंदोलकांचे हाल खुद्द पत्रकार मंडळी पाहात होती. लेकरांच्या भुकेचा आकांत पाहून मग ५-१० किलो चिवड्याची व्यवस्था केल्याने मुलांना तो वाटण्यांत आला. J. M. F. C. कोर्टाने सर्वांना १३५ कलमाखाली वैयक्तिक जामिनावर सोडले. पण १०७ ह्या कलमाखाली सर्व आंदोलकांना तहसीलदारांनी १४ दिवसाचा (३० मार्चपर्यंत) न्यायालयीन कस्टडी रीमांड दिला. गंभीर गुन्हे करणारांना वैयक्तिक जामिनावर सोडणाऱ्यांनी या आंदोलनकर्त्यांसाठी ५०००/- चा जामीन मागितला.

१८ मार्चला कारागृहांकडे रवानगी झाली तेव्हा त्यांना कारागृहांबाहेर ठेवण्यात आलेल्यापैकी सौ. लीलाबाई मार्कड (सदस्य ग्रा. पं. लाडेगांव आणि सौ. कमलाबाई गादे ह्या अधिकाऱ्यांनी घडविलेल्या उपवास आणि उन्हामुळे आजारी पडल्या.

प्रकरण १८ मार्चला न्यायालयात. १९ मार्चला स्टेटस्को (जैसे थे). विहिरीचे खोदकाम थांबल्याने सर्व आंदोलकांना आनंद.

**शासनाची दडपशाही सुरूच**

आंदोलकांना जामिनावर सोडण्याचे गावकऱ्यांचे व परिसरातील लोकांचे प्रयत्न सुरू झाले. आंदोलकांनी जामिनावर सुटका करून घेण्यास नकार दिला पण काही लोकांनी समजूत घातल्यावर ते तयार झाले. मग जमानत सहज मिळणार यासाठी सर्व अडथळे निर्माण केले. लेखणी बंद आंदोलनही कर्मचारी करीत होते. दरम्यान गावात आणि जेलमध्ये अफवाबाजी चालू होती. लाडेगांव येथील कुटील राजकारणी लोकांना यात सामील करून घेण्यात आले.

दि. १७ मार्च ९४ ला गावात सशस्त्र पहारा असताना संघटनेचे कार्यकर्ते ज. निसारखाँ पठाण आणि आंदोलनात सक्रीय सहभागी असलेल्या पार्वतीबाई सिदगुर यांचे घरी चोऱ्या झाल्या. ह्या चोऱ्यांचा अजून तपास लागला नाही. ह्या चोऱ्यांबाबत अनेक तर्कवितर्क परिसरात आहेत.

**आंदोलनात सामील लोकांवर अधिकारशाहीचे आक्रमण**

१) १७ मार्च पूर्वी गजानन अमदाबादकर याच्या शेतातील विजेचे कनेक्शन तोडण्यांत आले.

२) २२ ते २३ मार्चला महिला आघाडीच्या सदस्या सौ. सुशिला सुरजुसे यांचे पती व सौ. मुक्ताबाई सिदगुर यांचे पुतणे व नातू अनुक्रमे श्री. उत्तमराव रामचंद्र सुरजुसे, श्री. रामराव सिदगुर आणि गजानन सिदगुर यांच्या हेतुपुरस्पर बदल्या करण्यात आल्या. जि. प. अकोला अंतर्गत अंदाजे ६५०० शिक्षक काम करतात. त्यापैकी फक्त या तीनच शिक्षकांच्या बदल्या, त्याही ऐन परीक्षेच्या काळात, निव्वळ सूडबुद्धीने, आंदोलकांचे मनोधैर्य खचविण्याच्या हेतूने करण्यांत आल्या हे उघड आहे.

३) आंदोलकात पुरुषोत्तम राजेंद्र सातंगे आणि मिजाज काझी हे विद्यार्थी सामील झाले. पैकी पुरुषोत्तमला परीक्षा द्यायला परीक्षा केंद्रावर हथकडी लावून न्यायला अधिकारशाहीने कमी केले नाही.

वरील हालचालींवरून लाडेगांवकरांवर झालेली कार्यवाही निव्वळ पाणीसमस्येसाठी झाली नाही हे उघड आहे.

**कार्यवाहीचे कारण**

शेतकरी संघटनेच्या गावबंदी कार्यक्रमाचा पहिला फटका या परिसरात येथील खासदार अनंतराव देशमुख यांना (ते आमदार असताना) याच गावात बसला होता. अधिकारी आणि पदाधिकारी यांच्या बद्दलची भीती घालविण्याचं काम ज्या लाडेगांवनी केलं त्याला कुठेतरी दाबलं पाहिजे हाच या कार्यवाही मागचा उद्देश असावा.

**विरोधी पक्ष गप्प**

अकोला जिल्ह्यात कुठेही बंदुकीच्या जोरावर नळ योजनेच्या विहिरीचे बांधकाम झाले नाही. यापूर्वी कारंजा (लाड) तालुक्यातच वाई (कारंजा) गावासाठी शेजारच्या पोहा गावी नळ योजनेची विहिर मंजूर झाली होती. पण पोहावासियांनी हरकत घेतल्याने ती इतर ठिकाणी घेण्यांत आली. लाडेगांववासियांसोबत मात्र साध्या चर्चेचेही सौजन्य अधिकाऱ्यांनी दाखविले नाही.

सध्या काम बंद असले तरी पुन्हा कधीही सुरू होऊ शकते. लाडेगांवात तणाव कायम आहे. इतकी भयानक कार्यवाही लाडेगांवकरांवर झाली तरी परिसरातील विरोधी पक्ष गप्प आहे. यात निव्वळ मताचं राजकारण असावं किंवा हे गाव राजकीय दृष्टीने सोयीचं नाही म्हणून असावं. (लाडेगांव लोकसंख्या २०००, कामरगाव लोकसंख्या १२०००)

**विलासराव साळुंखे अभ्यास गटाचे मत**

दि. २ मे ९४ ला महाराष्ट्राच्या जलसंवर्धन परिषदेचे सदस्य श्री. विलासराव साळूंखे काही लोकांसह या प्रकरणाचा अभ्यास करण्यासाठी आले तेव्हा त्यांनी लाडेगांवला दुसरी विहिर खोदण्याची गरज

*(पान १२ पहा)*

# शेतकऱ्यांच्या केलेल्या लुटीचा अर्थात उणे सबसिडीचा मायबाप सरकारने दिलेला जाहीर कबुलीजबाब

## (गॅटमधील शेतीविषयक वाटाघाटींमध्ये इंडिया सरकार सादर केलेल्या आकडेवारीवरून)

| पीक | देशांतर्गत प्रशासित किंमत रुपये/टन | | | खुल्या बाजारातील किंमत रुपये/टन | | | उत्पादन दशलक्ष ट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९८६-८७ | १९८७-८८ (१) | १९८८-८९ | १९८६-८७ | १९८७-८८ (२) | १९८८-८९ | १९८६-८७ | १९८७-८ (३) |
| तांदूळ | २१९० | २२५० | २४०० | ३५२०.०० | ३५२०.०० | ३५२०.०० | ६०.५६ | ५६. |
| गहू | १६६० | १७३० | १८३० | ३५४०.०० | ३५४०.०० | ३५४०.०० | ४६.१७ | ५४. |
| मका | १३२० | १३५० | १४५० | ३१२१.०० | ३१२१.०० | ३१२१.०० | ७.५९ | ५. |
| तूर | ३२०० | ३२५० | ३६०० | ५२४३.०० | ५२४३.०० | ५२४३.०० | २.२७ | २. |
| हरभरा | २८०० | २९०० | ३२५० | ४१२८.०० | ४१२८.०० | ४१२८.०० | ३.६३ | ५. |
| उडीद | ३२०० | ३२५० | ३६०० | ४३८५.०० | ४३८५.०० | ४३८५.०० | १.२४ | १. |
| मूग | ३२०० | ३२५० | ३६०० | ४७८२.०० | ४७८२.०० | ४७८२.०० | १.०८ | १. |
| भुईमूग | ३७०० | ३९०० | ४३०० | ६९००.०० | ६९००.०० | ६९००.०० | ५.८८ | ५. |
| सोयाबीन | २९०० | ३००० | ३२०० | ३०८१.०० | ३०८१.०० | ३०८१.०० | ०.८९ | ०. |
| कापूस | ५४०० | ५५०० | ६००० | १७३३३.०० | १७३३३.०० | १७३३३.०० | १.१७ | १. |
| राई व मोहरी | ४१५० | ४३०० | ४६०० | ६८८४.०० | ६८८४.०० | ६८८४.०० | २.६१ | ३. |
| ज्यूट (कच्चा) | २२५० | २४०० | २५०० | ५५९९.०० | ५५९९.०० | ५५९९.०० | १.३२ | १.० |
| तंबाखू | १२००० | १२२०० | १२८०० | १२२४०.०० | १२२४०.०० | १२२४०.०० | ०.११ | ०.० |
| ऊस | १७० | १८५ | १९५ | १५६.१६ | १५६.१६ | १५६.१६ | ८५.२२ | ९३.९ |
| बाजरी | १३२० | १३५० | १४५० | २७०४.०० | २७०४.०० | २७०४.०० | ४.५१ | ३.३ |
| ज्वारी | १३२० | १३५० | १४७३ | २९४५.०० | २९४५.०० | २९४५.०० | ९.११ | १२.२ |
| बार्ली | १३५० | १३५० | १४५० | ४०२४.०० | ४०२४.०० | ४०२४.०० | १.५८ | १.७ |
| | | | | | | | | |

# सबसिडी = प्रशासित किंमत – खुल्या बाजारातील किंमत

| स<br>८ | १९८८-८९ | किंमत<br>दशलक्ष रुपये<br>१९८६-८७ | <br><br>१९८७-८८<br>(४) = (१×३) | <br><br>१९८८-८९ | एकूण किंमत<br>दशलक्ष रुपये<br>१९८६-८९<br>(५)=बेरीज(४) | वार्षिक<br>सरासरी किंमत<br>दशलक्ष रुपये<br>(६)=सरासरी(४) | सबसिडी रक्कम<br>दशलक्ष रुपये<br>(७)=३×(१-२) | सबसिडी<br>एकूण किंमतीच्या<br>टक्के<br>(८)=((७)÷(६))×१०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८६ | ७०.४९ | १३२६२६.४० | १२७९३५.०० | १६९१७६.०० | ४२९७३७.४० | १४३२४५.८० | –७७२३५.०० | –५३.९२ |
| ११ | ४९.६५ | ७६६४२.२० | ९३६१०.३० | ९०८५९.५० | २६१११२.०० | ८७०३७.३३ | –८९८८०.०० | –१०३.२७ |
| ७२ | ८.२३ | १००१८.८० | ७७२२.०० | ११९३३.५० | २९६७४.३० | ९८९१.४३ | –१२५१७.०० | –१२६.५४ |
| २८ | २.७२ | ७२६४.०० | ७४१०.०० | ९७९२.०० | २४४६६.०० | ८१५५.३३ | –४५५०.०० | –५५.७९ |
| १३ | ४.२३ | १०१६४.०० | १४८७७.०० | १३७४७.५० | ३८७८८.५० | १२९२९.५० | –४९४५.०० | –३८.२५ |
| २९ | १.५९ | ३९६८.०० | ४१९२.५० | ५७२४.०० | १३८८४.५० | ४६२८.१७ | –१३९४.०० | –३०.१२ |
| २२ | १.४२ | ३४५६.०० | ३९६५.०० | ५११२.०० | १२५३३.०० | ४१७७.६७ | –१७५२.०० | –४१.९४ |
| ८५ | ९.६६ | २१७५६.०० | २२८१५.०० | ४१५३८.०० | ८६१०९.०० | २८७०३.०० | –२०४९४.०० | –७१.४० |
| ३० | १.५५ | २५८१.०० | २७००.०० | ४९६०.०० | १०२४१.०० | ३४१३.६७ | –१६.०० | –०.४७ |
| ०८ | १.४९ | ६३१८.०० | ५९४०.०० | ८९४०.०० | २११९८.०० | ७०६६.०० | –१४५४३.०० | –२०५.८२ |
| ४६ | ४.३८ | १०८३१.५० | १४८७८.०० | २०१४८.०० | ४५८५७.५० | १५२८५.८३ | –८६९४.०० | –५६.८८ |
| ४० | १.२१ | २९७०.०० | २४९६.०० | ३०२५.०० | ८४९१.०० | २८३०.३३ | –३८३३.०० | –१३५.४३ |
| ५७ | ०.११ | १३२०.०० | ६९५.४० | १४०८.०० | ३४२३.४० | ११४१.१३ | ११.०० | ०.९६ |
| ४० | ८५.६९ | १४४८७.४० | १७३७८.९० | १६७०९.५५ | ४८५७५.८५ | १६१९१.९५ | २४०५.०० | १४.८५ |
| ०० | ७.७८ | ५९५३.२० | ४४५५.०० | ११२८१.०० | २१६८९.२० | ७२२९.७३ | –६८२२.०० | –९४.३६ |
| ०० | १०.१७ | १२१३०.८० | १६४७०.०० | १४९८०.४१ | ४३५८१.२१ | १४५२७.०७ | –१६४५४.०० | –११३.२६ |
| २० | १.४७ | २१३३.०० | २३२२.०० | २१३१.५० | ६५८६.५० | २१९५.५० | –४२०३.०० | –१९१.४४ |
| | | ३०४४०३.३० | ३२६६१५.१० | ४०३०७३.०५ | १०३४०९१.४५ | ३४४६९७.१५ | –२३७४३७.०० | –६८.८८ |

## शेतकऱ्यांचे कैवारी

# विठ्ठल रामजी शिंदे

– अरविंद वामन कुलकर्णी, पुणे.

*(उत्तरार्ध)*

शेतकऱ्यांबाबत जे व्हायला हवे ते हितसंबंधी गटांच्या सहकार्याने होईल. त्याशिवाय हे होणे अशक्य अशी त्यांची मनोधारणा आहे. त्यांच्या एकूणच भूमिकेत संघर्षाला जागा नाही. १९३१ मधील वडनेर येथील चांदवड तालुका शेतकरी परिषदेत त्यानी आपण बोल्शेविक नाही असे आवर्जून सांगितले आहे. कारण 'मग तुमच्याशी विचारविनिमय करायला आणि तुमच्या सहकार्याची अतिशय नम्र याचना करायला आलो असतो काय?' असा त्यांचा सवाल आहे. पुढे आपला मार्गच भिन्न असल्याचे सुचविताना सांगतात, 'आम्हाला तर अद्यापि भांडवलदार व त्यांच्याच दाबाखाली असलेले इतर पांढरपेशे ह्यांच्याच उदार व विवेकी साहाय्याने खेड्यातल्या मुक्या, झोपाळू पण कष्टाळू जनतेला जागे करायचे.' तेव्हा प्रस्थापितांच्या हृदय परिवर्तनावर त्यांची मदार होती हे समजून येते.

शेतकऱ्यांच्या होणाऱ्या दुहेरी शोषणाची शिंद्यांना चांगली कल्पना आलेली होती असे म्हणण्यास त्यांच्या भाषणातच आधार मिळतो. बोरगाव येथील १९३२ च्या वाळवे तालुका शेतकरी परिषदेत अशा दुहेरी पिळवणुकीच्या ताळेबंद त्यानी अगदी थोडक्यात मांडला आहे. त्यांच्या मते, 'प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कराच्या रूपाने सरकार जो वसूल शेतकऱ्यांकडून आपल्या खजिन्यात खेचते तो त्याच्या वट्ट वसुलाच्या जवळजवळ नऊ दशांशाइतका असतो. पण खर्चाच्या बाजूने मोबदला परत खेड्यातल्या शेतकऱ्याला किती पोचतो हे पाहू गेल्यास मात्र नऊ शतांशही भरत नाही.' मग शेतकऱ्यांकडून जमा होणारी रक्कम कुठे खर्चिली जाते? तर 'तो सर्व खर्च शहरात राहणाऱ्यांच्या चोचल्यावर, सरहद्दीवरील सरदारांच्या बडेजावीवर आणि टेकडीवरील छोट्या व बड्या लाटांकरिताच होत असतो.' एखाद्या अर्थशास्त्रज्ञाच्या डोळ्यालाच दिसेल व मनाला भावेल असे हे गुंतागुंतीचे प्रत्यक्षामागचे वास्तव सत्य आहे.

माझ्या मते शेतकरी म्हणजे तोच की जो आपल्या कुटुंबाच्या व आश्रितांच्या पोषणाला, शिक्षणाला आणि योग्य त्या सुखसोयींना आवश्यक इतकीच आणि आपल्या आप्तांकडून व आश्रितांकडून वाहवेल इतकीच जमीन बाळगतो आणि ती आपण स्वतः आपल्या आप्तांच्या व आश्रितांच्या श्रमाने योग्य रितीने खरोखर वाहतो' अशी विठ्ठल रामजींनी बोरगावच्या १९३१ सालच्या वाळवे तालुका शेतकरी परषिदेत शेतकऱ्याची मोठी लवचिक अशी व्याख्या केलेली आहे. जमिनीची नुसती मालकी सांगणारे त्यांच्या मते भांडवलदारच होत. (म्हणजे उत्पादनाच्या साधनांची फक्त मालकी ज्यांच्याकडे ते!) 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वावर नंतर आलेला कूळकायदा किंवा कमला जमीन धारणा कायदा याची बीजे महर्षींच्या या व्याख्येत सापडतील.

'शेतकरी श्रीमंत झाला की तोच जमीनदार बनतो. मग तो इतर गरीब शेतकऱ्यांशी फटकून वागतो आणि इतर सत्ताधाऱ्यांच्या पंक्तीत बसतो' हे वडनेरच्या परिषदेत त्यानी मांडलेले मत ज्योतिबांच्या एका मताची आठवण करून देणारे आहे. कुणब्याचा मुलगा शिकून नोकरदार वा अंमलदार झाला की प्रथम कुणब्यालाच विसरतो असे ज्योतिबांचे निरीक्षण होते. इथे विठ्ठल रामजी फक्त आर्थिक सूत्र ध्यानी घेत आहेत इतकेच. हे अयोग्य, म्हणूनच ते पुढे सांगतात की, 'असे होऊ नये म्हणून आपसात जूट हवी.' म्हणजे संघटनेचे संरक्षण हवे, धाक हवा.

शासन, नोकरशाही, सावकार आणि त्यांचे हितसंबंधी हे सर्व विरोधात असलेल्या शेतकऱ्याने मग आत्मोन्नतीसाठी काय करायला हवे? याच भाषणात ते पुढे सांगतात की 'राष्ट्राच्या अर्थकारणात तुम्ही आपला एक हात अर्थ उत्पादनात गुंतवून दुसरा हात त्या उत्पन्न केलेल्या अर्थाची पुढे विल्हेवाटी कशी चालली हे पाहून, ह्या अर्थगाड्याच्या बैलांची शिंगदोरी खेचण्याकरिता नेहमी मोकळा ठेवणे जरूर आहे.' इथे त्यानी अमेरिकेतील शेतकऱ्याचे उदाहरण दिले आहे. त्याने देशाच्या व्यापारावर ताबा राखला आहे. कच्च्या मालाच्या निर्मितीबरोबरच त्याच्या उतारपेठेवरही त्याचा ताबा आहे. तेव्हा शिंद्यांची अपेक्षा अशी आहे की शेतीमालाच्या बाजारपेठेवर, व्यापारावर शेतकऱ्याचा ताबा आला पाहिजे. त्याशिवाय त्याचा व्यवसाय किफायतशीर होणार नाही. त्याला योग्य तो आर्थिक न्याय मिळणार नाही. म्हणजे याशिवाय त्याच्या आर्थिक दशेत बदल घडणे शक्य नाही.

त्या काळाच्या पार्श्वभूमीवर विचार करताना महर्षी शिंद्यांना झालेली ही जाणीव अभिनव म्हणावी अशीच आहे. असे दिसते की 'शेतकरी विरुद्ध सरकार, सावकार, व्यापारी इ. आर्थिक हितसंबंधियांचे षड्यंत्र' असे त्याना त्या काळात जाणवून गेलेले द्वंद्व होते. त्यावर मात केल्यानेच शेतकऱ्याचे दारिद्र्य दूर होईल अशी त्यांची धारणा होती.

खरे तर त्या काळात भारतावर इंग्रजांचे राज्य होते. सारा देशच त्यानी कच्च्या व पक्क्या मालाबाबतीत एक उतारपेठ बनविलेला होता. कच्चा माल कमीत कमी किमतीला खरेदी करणे आणि पक्का माल जास्तीत जास्त किमतीत नफा घेऊन विकणे असाच त्यांचा एकूण व्यवहार होता. त्यांच्या वसाहतवादाला बलवत्तर संदर्भ होता तो आर्थिकच आणि असा आर्थिक हितसंबंध सुरक्षित राहावा म्हणून जो काय असेल तो राजकीय संदर्भ! इंग्लंडच्या यंत्रोद्योगाला आणि तज्ज्ञन्य व्यापारी भरभराटीसाठी भांडवलाचा पुरवठा करून घेतला जात होता तो भारताच्या शोषणातून. भारतातील कृषिउद्योग आणि यंत्रउद्योग असा भेदभाव इंग्रजांच्या

शोषण नीतीत नव्हता. हा सर्व व्यवहार सुरळीतपणे चालू राहील अशी एक अर्थनीती किंवा अर्थव्यवस्थाच निर्माण केली गेलेली असल्यामुळे (महर्षी शिंद्यांना अभिप्रेत असलेला) शेतकऱ्यांचा बाजारपेठेवर ताबा ही भारतात अशक्यप्राय गोष्ट होती. महर्षींच्या लक्षात न आलेली गोष्ट म्हणजे ही शोषण व्यवस्था! इथले शासन, इथली नोकरशाही, इथले संस्थानिक किंवा इथले सावकार यांनीच शेतकरीविरोधाचे एक स्वार्थी षड्यंत्र उभे केले आहे असे त्यांना वाटते. त्याचे कारण त्यांच्या लक्षात न आलेली व्यवस्था आहे. हे सारे त्या व्यवस्थेचे घटक आहेत. ते तसे स्वतंत्र नाहीत आणि त्यामुळे ते शेतकऱ्याबाबत उदारमतवादी होऊच शकत नाहीत याची जाण विठ्ठल रामजीना व्यवस्थेचे ज्ञान झाल्यावरच आली असती.

कारण असे पाहा की इंग्रज इथून गेल्यानंतर तरी ही व्यवस्था (आणि तज्ञन्य शेतकऱ्याची स्थिती) सुधारली वा बदलली असे झाले आहे का? दुर्दैवाने याचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागते. म्हणजे इंग्रज गेल्याने शासक बदलले, पण व्यवस्था तीच राहीली. म्हणजे परदेशी यंत्रोद्योग चालकांची जागा देशी यंत्रोद्योगचालकांनी घेतली. लंडन, मँचेस्टर ऐवजी मुंबई, दिल्ली, कलकत्ता यांची धन सुरू झाली, हाच काय तो फरक! आधी सार हिंदुस्थान आर्थिक शोषणाची शिकार झालेला, आता शेतीप्रधान हिंदुस्थान यंत्रोद्योगप्रधान हिंदुस्थानची शिकार झालेला, अवजड यंत्रोद्योगासाठी आणि जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी भांडवलपुरवठा ही आवश्यक बाब होती. तो शेतीच्या वरकड मूल्यातून (Surplus) जमा करणे आणि त्यासाठी शेतमालाचे भाव दाबून ठेवणे असा व्यवहार चालू झाला. यात ग्रामीण भाग व शेतकरी नव्याने नागविला जाऊ लागला. कूळकायदा आला, कमाल जमीनधारणा कायदा झाला, शेतमालक नसणारे अनेकजण शेतमालक झाले. तसेच सरकारी पातळीवरून शेतीसाठी नाना अमिषे-प्रलोभने दाखविली गेली. पण शेतीवर जगणारी हिंदुस्थानातील सत्तर टक्क्यावरची जनता आजही आहे त्याच दुःस्थितीत जगत राहीलेली दिसते. हा सर्व नववसाहतवादाचाच परिणाम होय.

विशेषतः ज्या गांधी-नेहरूंच्या दाबाखालील काँग्रेसबद्दल विठ्ठल रामजींना विश्वास वाटत होता तिच्या राज्यातच हिंदुस्थानाची दोन आर्थिक शकले झाली आणि इंग्रजांच्याच नीतीचा किंवा व्यवस्थेचा अवलंब करून यंत्रोद्योगप्रधान 'शहरां'नी कृषिउद्योगप्रधान 'खेड्यां'चे शोषण सुरू केले. यात म. गांधी आणि त्यांचे धोरण अखेरपर्यंत कृषिसंस्कृतिप्रधान असलेल्या हिंदुस्थानच्या बाबतीत शेतीनिष्ठ होते असे दिसते. १९४६ साली ते आणि नेहरू यांच्यात झालेल्या पत्रव्यवहारातून ते स्पष्ट होते. स्वतंत्र होऊ घातलेल्या हिंदुस्थानच्या विकास योजनेत केंद्र (nucleus) काय असावे या विषयीची साधारणपणे ही चर्चा आहे. शेती की अवजड यंत्रोद्योग? महात्मा गांधींची मते शेतीकडे झुकताना दिसतात. कारण ती या देशाची 'प्रकृती' आहे. तिच्या नैसर्गिक विकासातच या देशाच्या विकसनाची बीजे असू शकतात असे हे साधे सरळ गणित दिसते. आवश्यक असेल तर नव्या विज्ञानाची जोडही शेतीला देता येऊ शकते. पण नेहरूंचा कौल यंत्रोद्योगाकडे झुकलेला होता. परंपरेने कृषिप्रधान असलेल्या भारताच्या दृष्टीने हे उघडपणे कृत्रिम कलम होते. विसंगत होते. साडेसहा लाख खेड्यांना ज्याची ओळखही नाही ती गोष्ट विकासक्षम म्हणून यांच्यावर लावणे कसे योग्य होऊ शकेल? आजच्या स्पर्धेच्या जगात टिकायचे, पुढे यायचे म्हणून जरी ते योग्य असले तरी क्रमाक्रमाने असे औद्योगिक प्रगतीचे तत्त्व कृषिप्रगतीच्या पचनी पाडणे आवश्यक होते. पण तसे झाले नाही. मग एकदा हे केंद्र ठरले की त्यासाठी भांडवलाची उभारणी करायला हवी. मग ते उभे करण्याचे क्षेत्र म्हणजे शेती हे ओघानेच आले.

श्री. शरद जोशी यांच्या 'शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती' या ग्रंथातील मजकूर, ज्याचा प्रतिवाद आजवर झालेला दिसत नाही - (ग्रंथाच्या चवथ्या प्रकरणात) असे सांगतो की, ''स्वातंत्र्य मिळण्याच्या आधी १९४६ साली, इंग्रज सरकारपुढे श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी अध्यक्ष असलेल्या एका समितीने एक शिफारस ठेविली की, 'नैसर्गिक आपत्तीमुळे देशातला शेतकरी इतका बिकट अवस्थेत आहे की, त्याला मदत करणे आवश्यक आहे आणि ती मदत करण्याचा सगळ्यात सोपा आणि परिणामकारक उपाय म्हणजे त्याच्या मालाला बाजाराची आणि भावाची शाश्वती मिळवून देणे होय'... या शिफारसीची इंग्रजी अमलात अंमलबजावणी होणे अशक्य होते. ती झाली नाहीच, ''उलट स्वातंत्र्यानंतर या व्यवस्थेने अशी जादू केली की १९५१ साली याच व्ही. टी. कृष्णम्माचारींचा मोठा सहभाग असलेली पंचवार्षिक योजना तयार करताना असा विचार मांडला गेला की 'या देशाचा विकास व्हायचा असेल तर शेतीचे उत्पादन वाढले पाहिजे, आणि शेतीमालाच्या किमती योग्य अशा खालच्या पातळीवर स्थिर राहिल्या पाहिजेत.' अनेक अहवालांपैकी एका अहवालातील पंडित नेहरूंचा स्वतःचाच उतारा पाहा, 'जर का या देशामध्ये उद्योगधंद्याची वाढ व्हायची असेल तर शेतीचे उत्पादन वाढवून तो माल स्वस्तात स्वस्त मिळविता आला पाहिजे.' तेव्हा शेतीचे उत्पादन वाढवायचे कशासाठी? तर देशाच्या विकासासाठी आणि या वाढलेल्या उत्पादनाची किंमत मात्र खालच्या पातळीवर ठेवायची. ती कशासाठी? तर अधिक भांडवल जमा करण्यासाठी, असा हा प्रकार होता.

नियंत्रित वा संरक्षित अर्थव्यवस्था आणि खुली अर्थव्यवस्था या पर्यायांपैकी नियंत्रित अर्थव्यवस्थेचा पर्याय नेहरूंनी स्वीकारला. परमिट किंवा लायसन्स राज्य हे त्याचेच दृश्य रूप होय. अमेरिका व रशिया या दोन महासत्तांच्या रस्सीखेचीत फायदेशीर म्हणून हा पर्याय निवडला गेला असेल. पण या व्यवस्थेत शेतीला उत्पादनखर्चानुसार भाव बांधून देऊन संरक्षण देणे आवश्यक होते. ते मात्र टाळले गेले, उलट शेती उत्पादनात कमतरता असेल तेव्हा लेव्हीची बळजबरी आणि मुबलकता असेल तेव्हा घसरत्या बाजारभावाच्या स्थितीत शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडून देणे असे धोरण स्वीकारले गेले. या नेहरूनीतीचा परिणाम शेतीव्यवसाय बेकिफायतशीर होणे आणि त्यावर अवलंबून असणाऱ्या सत्तर टक्के जनतेचे जीवनमान खालावत जाणे, त्यांची क्रयशक्ती संपुष्टात येण्याच्या मार्गाला लागणे यात झाले. 'परमिट

राज्या'त सुद्धा मुख्यतः 'स्क्रू ड्रायव्हर' तंत्र विकसित झाले आणि क्रमाक्रमाने देशाची आर्थिक स्थिती मोडकळीलाच आली. विशेषतः, नजीकच्या भूतकाळात घडलेल्या रशियाच्या आत्मविध्वंसनानंतर हुकमी साम्यवादी बाजारपेठ गमविलेल्या हिंदुस्थानसारख्या देशाची स्थिती आर्थिकदृष्ट्या किती अगतिक वा शोचनीय झालेली आहे याचा सर्वजण अनुभव घेत आहेतच.

नेहरूंच्या नंतर लालबहाद्दूर शास्त्री पंतप्रधान असताना 'कृषिमूल्य आयोगा'ची निर्मिती करण्यात आली. त्यानेही शेतीव्यवसायाचा वा शेतकऱ्याचा काही फायदा झाला असे दिसत नाही. व्यवस्थेची आकडेमोडीतील एक नवी चलाखी मात्र अनुभवास येते गेली. उदा. किंमत नक्की करण्यासाठी दुधाचा उत्पादनखर्च काढताना जमेच्या बाजूला येते म्हणून शेणखताच्या गाडीची किंमत पन्नास रुपये धरणे आणि इतर पिकांच्या उत्पादनखर्चाच्या बाजूला जाते म्हणून त्याच शेणखताच्या गाडीखी किंमत पाच रुपये धरणे किंवा हेक्टरभर जमिनीचा औषधसिंचनाचा खर्च १३ पैश्यांच्या आसपास धरणे. शेतकऱ्यांच्या सहकारी चळवळीला धनंजयराव गाडगीळ आणि विखे पाटील देऊ पाहत असलेले आर्थिक अधिष्ठान राजकीय सत्ताकेंद्रात कसे परावर्तित झाले हे कुणाला समजले देखील नाही. अजूनही शेतकऱ्यांच्या म्हटल्या जाणाऱ्या आणि त्यांच्याच भागभांडवलावर उभ्या राहणाऱ्या सहकारी कारखान्याकडून उसाला दिले जाणारे भाव दिल्लीत ठरत असतात. खुद्द महाराष्ट्र शासनाचे जे उसाचे मळे आहेत तिथेही दरवर्षी तोट्याचे आकडेच फुगत जाताना दिसतात ही वस्तुस्थिती काय दर्शविते? सारा देश एकच, पण महाराष्ट्रात कापसाला सातशे ते नऊशे रुपये प्रतिक्विंटल भाव आणि लगतच्या मध्यप्रदेश वा आंध्र राज्यात अकराशे ते चौदाशे रुपये भाव. त्यातच राज्य ओलांडून कापूस परराज्यात विकायला न्यायला शेतकऱ्याला बंदी. कारखानदाराला आपले उत्पादन निर्यात करायला सरसहा परवानगी पण तीच शेतीमालाला नाही. हे सारे आपापतः झालेले नाही किंवा होत नाही. यामागे एक निश्चित असे व्यवस्थाजन्य धोरण आहे. ते म्हणजे अवजड यंत्रोद्योगासाठी आवश्यक असलेले भांडवल शेतीच्या, शेतकऱ्याच्या शोषणातून उभे करणे. (शिवाय, विठ्ठल रामजी सुचवितात तशा शेतकऱ्याला जखडबंद करणाऱ्या या प्रस्थापित व्यवस्थेच्या युक्त्या आहेत.)

म्हणून भांडवलाचा संचय जिथे होतो त्या शहराकडे खेड्यातून 'कसदार तरूणां'चा ओघ चालू होतो हे विठ्ठल रामजींचे निरीक्षण सर्वार्थाने सत्य आणि मोलाचे ठरते. ग्रामीण भागतील (शेतकऱ्यांचे) दारिद्र्य कमी झाले पाहिजे या त्यांच्या म्हणण्याचा आज आपण गोळाबेरीज अर्थ घेऊ तो म्हणजे सामान्य खेडुताची क्रयशक्ती वाढली पाहिजे, हाच होय. वरच्याचे कमी कमी करून खालच्याला द्यायचे आणि त्याची आर्थिक ताकद वाढवायची, जीवनमान सुधारायचे या सूत्राला अनुसरून डॉ. वि. म. दांडेकर यानी सुचविलेला तोडगा कार्यवाहीत आणला जाऊनही बरीच वर्षे झाली. त्यासाठी नोकरदार व इतर व्यावसायिक लोक यांच्याकडून व्यवसायकर जमाही केला जातो आहे. त्यामुळे रोजगारहमीची चार कामे होताना दिसतात. पण मूळ उद्दिष्टाचे काही भले झालेले दिसत नाही. दारिद्र्याचा रोग तसाच आहे.

हिंदुस्थानसारख्या, परंपरेने कृषिप्रधान देशात शेतकरीच आर्थिक पारतंत्र्यात गुंतविला जावा ही विठ्ठल रामजीना लागलेली बोचणी साऱ्या देशस्थितीच्या दृष्टीने मोठी मोलाची आहे. शेतकऱ्याच्या आर्थिक स्वातंत्र्याचा त्याना लागलेला ध्यास आजच्या एखाद्या शरद जोश्यांच्या ध्यासाच्या अस्सल जातीतला आहे. त्यामागे कसलाही अन्य स्वार्थी 'राजकारणी' हेतू नाही. सत्तर टक्क्यावर असलेल्या शेतकऱ्याच्या आर्थिक उद्धारात साऱ्या देशाचा उद्धार सामावलेला आहे. याची त्यांना खात्री पाटलेली आहे. म्हणून 'शेतकऱ्यांनो, तुमच्या आर्थिक स्वातंत्र्यातच परकीय सरकार काय किंवा स्वकीय सरकार काय, कोणत्याही मानवी सत्तेला वेसण घालण्याचे सामर्थ्य आहे, हे खरे नव्हे काय?' (१९३१ ची वडनेर येथील चांदवड तालुका शेतकरी परिषद) हा त्यांचा आत्मविश्वासाने मढलेला सवाल साठेक वर्षे उलटूनही आजसुद्धा नवा कोरा आणि अर्थपूर्ण भासतो. कारण भारतासारख्या कृषिप्रधान देशाचे आणि त्यातच आजही मान्य होईल असे त्यांचे मोठेपण सामावलेले आहे.

साऱ्या जीवनाचा मूलाधार असलेले आणि अनुकूल परिस्थितीत संख्यात्मक दृष्ट्या अनेक पटींच्या निर्मितीची शक्यता असेले शेतमालाचे उत्पादन काढणाऱ्या, पण (दुर्दैवाने) दुर्लक्षित व दरिद्री राहिलेल्या शेतकऱ्याच्या प्रश्नांना नेमकी आर्थिक चौकट देऊन प्रतिष्ठा देण्याचे कार्य हे विठ्ठल रामजींचे मोठेच योगदान होय.

त्यांचे हे कार्य सुरू होण्याच्या आधीच १९१९ साली इतिहासाचार्य राजवाडे यानी 'महाराष्ट्रातील कर्त्या पुरुषां'च्या यादीत - पहिल्या दीडेकशे नांवाच्या आणि दुसऱ्या पन्नासेक नांवाच्या 'गाळीव' यादीतही विठ्ठल रामजी शिंदे यांचे नांव घातलेले आहे. अस्पृश्यांसाठी त्यानी केलेले काम ध्यानी घेऊन 'अंत्यजोद्धारक' असे बिरुदही राजवाड्यांनी शिंद्यांना दिलेले आहे. शेतकऱ्यांबाबत त्यानी केलेले कार्य लक्षात घेता या बिरुदाला एक नवे अर्थपरिमाण प्राप्त होताना दिसते. नुसता सामाजिक दृष्ट्याच नव्हे तर आर्थिक दृष्ट्याही समाजातील शेतकऱ्यासारख्या अन्त्य घटकाचा कैवारी असा हा आज अर्थ होईल आणि तो निश्चितच विठ्ठल रामजींचे मोठेपण सिद्ध करणारा आहे.

**दरसाल चोवीस हजार कोटी लुटले**
**मग वाडवडिलांपासून साचलेले**
**चौदा हजार कोटी**
**कसे नाही फिटले?**

**उठ ग्यानबा, धर गचांडी**
**कर लादून म्हणे**
**देतात सबसिडी**

# स्वतंत्र भारत आंदोलन

## मुंबई परिषदेचा संक्षिप्त वृत्तांत

शेतकरी संघटनेच्या राजकीय समितीच्या पुढाकाराने दि. २८ मे १९९४ रोजी देशभरातील स्वातंत्र्यप्रेमी कार्यकर्ते व विचारवंत यांची परिषद मुंबईत भारतीय विद्याभवनात पार पडली. चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी, स्वतंत्र्याची गळचेपी करणाऱ्या नेहरूधोरणाला विरोध करण्यासाठी १९६४ मध्ये स्थापन केलेल्या 'स्वतंत्र पक्षा'चे निष्ठावंत कार्यकर्ते श्री. एस्. व्ही. राजू व त्यांचे सहकारी यांनी या परिषदेच्या आयोजनाची सर्व जबाबदारी पार पाडली.

परिषद ठीक साडे दहा वाजता सुरू झाली. व्यासपीठाच्या पार्श्वभूमीवर महात्मा गांधी व राजाजी म्हणजे चक्रवर्ती राजगोपालाचारी यांचे भव्य तैलचित्र लावलेले होते. व्यासपीठावर सर्वश्री मिनू मसानी, शरद जोशी, राम जेठमलानी, एस्. व्ही. राजू, किसान समन्वय समितीचे अध्यक्ष बिपीनभाई देसाई (गुजरात), माजी अध्यक्ष भूपेंद्रसिंह मान (पंजाब), सदस्य रतन सिंह (हरयाना) आणि शेतकरी संघटनेचे अध्यक्ष पाशा पटेल, राजकीय समितीचे सदस्य मोरेश्वर टेमुर्डे, सौ. सरोज काशीकर, डॉ. वसंतराव बोंडे, शिवराज तोंडचिरकर उपस्थित होते.

परिषदेस देशभरातील सुमारे साडेतीनशे कार्यकर्ते व विचारवंत उपस्थित होते. शेतकरी संघटनेचे कार्यकर्तेही व गुजरात, पंजाब, हरयाणा राज्यांतील शेतकरी प्रतिनिधी मोठ्या प्रमाणावर हजर होते.

ज्यांच्या प्रेरणेने स्वतंत्र भारत आंदोलनाचे रणशिंग फुंकले गेले त्या, स्वतंत्रता चळवळीचे अध्वर्यू श्री. मिनू मसानी यांनी परिषदेचे उद्घाटन करून या आंदोलनाला शुभेच्छा व्यक्त केल्या. पंचाऐंशी वर्षाच्या या वयोवृद्ध स्वातंत्र्यप्रेमीने वयोमानामुळे आपण या आंदोलनात सक्रीय भाग घेण्यास असमर्थ असल्याबद्दल चुटपूट व्यक्त केली.

श्री. एस्. व्ही. राजू यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून सुप्रसिद्ध कायदेपंडीत श्री. राम जेठमलानी यांनी परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारावे अशी विनंती केली, ती परिषदेने व जेठमलानींनी मान्य केले. आणि परिषदेच्या कामकाजाला सुरुवात केली.

श्री. शरद जोशी यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात नेहरूव्यवस्थेमुळे क्षतिग्रस्त झालेल्या देशाच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला व या परिस्थितीत देशातील नागरिकांसमोर अगदी नवीन, व्यक्ति-स्वातंत्र्याची पुनर्स्थापना करणारा पर्याय उभा करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. त्या दृष्टीने, जमलेल्या सर्व स्वातंत्र्यप्रेमींनी नेहरूव्यवस्थेमुळे झालेल्या नुकसानीतून देशाला बाहेर काढण्यासाठी उपस्थितांनी, मुख्यतः कायदा व सुव्यवस्था, सरकारशाहीच्या अधिकारांची छाटणी, आर्थिक सुधार, निवडणूकप्रणाली सुधार आणि सामाजिक सुधारांसाठी उपाययोजना या मुद्द्यांवर चर्चा करावी अशी त्यांनी विनंती केली.

प्रास्ताविकानंतर उपस्थित कार्यकर्त्यांनी व विचारवंतांनी चर्चेत भाग घेतला. विचार मांडू इच्छिणाऱ्यांची संख्या पाहून परिषदेच्या अध्यक्षांनी सर्व वक्त्यांना दहा मिनिटांची कालमर्यादा घालून दिली होती.

*परिषदेचे अध्यक्ष राम जेठमलानी संचलन करित असताना. सोबत आमदार तोंडचिरकर, शरद जोशी, मिनू मसानी व एस्. व्ही. राजू दिसत आहेत.*

*शरद जोशी प्रास्ताविक करित असताना*

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On June 6, 1994

To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
June 6, 1994

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

देशातील जनता सरकारशाहीच्या अनिर्बंध अधिकारांना विटली असून व्यक्तिस्वातंत्र्याची बूज राखणारा पर्याय उभा राहिला तर त्याच्या पाठीमागे ती सर्व शक्तीने उभी राहील असा विश्वास सर्व वक्त्यांनी व्यक्त केला.

साडेचार पाच तासांच्या सलग चर्चेनंतर परिषदेने एक विस्तृत ठराव सम्मत केला.

कायदा व सुव्यवस्थेची यंत्रणा पार कोलमडून गेली आहे, देशातील जातीयवादी तसेच ऐतखाऊ शक्ती आणि देशातील तसेच बाहेरील शत्रू यांच्या आक्रमणाच्या धोक्याची सावट पडलेली आहे अशा कवडीमोल, दिवाळखोर व अगतिक अवस्थेतून देशाला चालू शतक उलटायच्या आत बाहेर काढून १९४७ पासून चालत आलेल्या नेहरूव्यवस्थेतील लायसेन्सपरमिटकोटा राज व पुढारी गुंडांचे राजकारण यांमुळे हतोत्साह झालेल्या जनतेच्या कार्यक्षमतेला व बुद्धिमत्तेला वाव देणारा देश म्हणून देशविदेशातील त्याचा ऐतिहासिक मान परत मिळवून देणे हे उद्दिष्ट बाळगणारा व त्यासाठी प्रयत्नशील राहाणारा 'स्वतंत्र भारत' नावाचा पक्ष स्थापन करण्याचे या परिषदेने ठरविले.

या नवीन पक्षाचे स्वरूप, बांधणी, कार्यक्रम ठरविणे, त्यासाठी त्या त्या कामांसाठी तज्ज्ञ कार्यकर्त्यांच्या समित्या बनविणे, परिषदेने मान्य केलेल्या तीस कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे कार्यक्रम आखणे, आंबेडकरांनी देशाला दिलेल्या मूलभूत घटनेमध्ये विकृती निर्माण करणारे नंतर घुसडलेले समाजवादाचे कलम नाकारूनसुद्धा या नवीन पक्षाला येत्या सार्वत्रिक निवडणुका लढविता याव्या यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे आणि या नवीन पक्षाचे घटनाअधिवेशन होईपर्यंत आवश्यक त्या सर्व कृती करण्याचे अधिकार असलेली एक प्राथमिक समिति नियुक्त करण्यात आली. या समितीचे सदस्य आहेत श्री. शरद जोशी, श्री. राम जेठमलानी व श्री. एस्. व्ही. राजू. येत्या पावसाळ्यानंतर लवकरात लवकर नवीन पक्षाचे पहिले अधिवेशन आयोजित करावे अशी विनंतीही परिषदेने या समितीला केली. परिषदेने स्वीकारलेल्या तीस कलमी कार्यक्रमात कायदा व सुव्यवस्था, सरकारशाहीच्या अधिकारांची छाटणी, आर्थिक सुधार, निवडणूक प्रणाली सुधार व सामाजिक सुधारांच्या उपाय-योजना या संबंधीचे कार्यक्रम आहेत.

परिषदेनंतर सायंकाळी साडेचार वाजता पत्रकार परिषद झाली. या परिषदेत श्री. शरद जोशी, एस्. व्ही. राजू व शेतकरी संघटनेच्या राजकीय समितीच्या सदस्यांनी परिषदेच्या कामकाजाची माहिती दिली. शेतकरी संघटनेसंबंधी पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देतांना श्री. शरद जोशींनी स्पष्टपणे सांगितले की नवीन पक्षाच्या स्थापनेत शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग असला तरी शेतकरी संघटना या पुढेही आपले स्वतंत्र अ-राजकीय अस्तित्व राखून ठेवील. ऑक्टोबर ९५ मध्ये नागपूर-चंद्रपूर परिसरात होणाऱ्या शेतकरी संघटना अधिवेशनात या विषयावर चर्चा होऊन पुढील धोरण व कार्यक्रमांची आखणी करण्यात येईल. ● ● ●

*(पान ५ वरून)*

नाही असे मत दिले आहे. कामरगांव नळयोजनेच्या विहिरीजवळ बांधलेला बंधारा व्यवस्थित बांधला गेला असता तर कामरगावच्या पिण्याच्या पाण्याची सोय झाली असती. हा बंधारा का कार्यान्वित केला नाही? असा लाडेगांवकरांचा सवाल आहे.

## लाडेगांवचे पाणी तोडायचे हाच कार्यक्रम

लाडेगांवला विहीर घेण्यामागे निव्वळ राजकीय सूडबुद्धी आहे. म्हणून पदाधिकारी आणि अधिकारी तेथेच विहीर घेण्याचा प्रयत्न करणार आहेत. ही चळवळ संघटनेची आहे आणि तिला दाबलंच पाहिजे असा एकूण कार्यक्रम आहे.

सारा गाव या प्रश्नावर एक झाला आहे. सर्व जाती, धर्माचे लोक (हिंदू, मुस्लिम, बौद्ध समाजाचे स्त्री-पुरुष) या आंदोलनांत सामील झाले. मुस्लीम महिलाही या आंदोलनांत जेल मध्ये होत्या. अशा आमच्या गावाला सरकारी आक्रमणांतून वाचविण्यासाठी तमाम कार्यकर्त्या भावाबहिणींच्या सहकार्याची आम्हाला गरज आहे. लाडेगांव विरुद्ध जिल्हाप्रशासन अशी ही लढाई असल्याने या लढाईत सर्वतोपरी मदत व्हावी अशी लाडेगांव येथील महिला आघाडी आणि पाणी बचाव आंदोलन समितीची विनंती आहे. ●

**उणे सबसिडीचा अर्थ ग्यानबा ग्यानबापर्यंत पोचविणे कार्यकर्त्यांना सोपे जावे म्हणून उणे सबसिडीचा तक्ता विस्तारित स्वरूपात पान ६-७ वर दिला आहे.**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.- ०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**